महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
बांधकाम भवन, मर्झबान पथ,फोर्ट, मंत्रालय,मुंबई-४०० ००१

दूरध्वनी क ०२२-२२८३९९२४ Email ID :- Sopr4.rdd-mh@nic.in

क्रमांक : व्हीपीएम-२०२६/प्र.क्र.६१/पंरा-४ दि. ०४ मे, २०२६

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
चंद्रपूर,वाशिम, हिंगोली
जिल्हा परिषद

विषय :- गारगाई प्रकल्पा करीता आवश्यक पर्यायी वनीकरणासाठीच्या जमिनीकरीता ग्रामपंचायतीची ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नसलेबाबत

संदर्भ :- महानगरपालिका आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र.एमजीसी/ए/२७०९, दि.१८.०४.२०२६.

महोदय,

बृहन्मुंबई महानगरपालिकेने महाराष्ट्र शासनाच्या दि १२.११.२०१३ च्या शासन निर्णयानुसार गारगाई प्रकल्प विकसीत करण्याचे काम हाती घेतले आहे. सदर प्रकल्पाअंतर्गत बाधित होत असलेल्या व पर्यायी वनीकरणाकरीता आवश्यक असलेल्या सुमारे ६५८ हेक्टर वन जमिनीपैकी ५९०.५४ हेक्टर वनेतर जमीन चंद्रपूर, वाशिम व हिंगोली येथे प्राप्त झाली आहे. गारगाई प्रकल्पा करीता आवश्यक पर्यायी वनीकरणासाठीच्या जमिनीकरीता संबंधित जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचे ना-हरकत प्रमाणपत्राबाबत अडचणी उद्भवत असल्याचे निदर्शनास आले आहे.

२. त्यानुषंगाने आपणास कळविण्यात येते की, गारगाई प्रकल्पा करीता आवश्यक पर्यायी वनीकरणासाठीच्या जमिनीकरीता ग्रामपंचायतींच्या ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.

३. तरी, संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त बाब त्यांच्या अधिनस्त सर्व पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या निदर्शनास आणून द्यावी व आवश्यक ती कार्यवाही करावी.

(श्रीम.क.श्री.पोतदार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- १) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका.
२)सह सचिव नवि २१, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

E:\बारसकर २०२६\प्र.क्र.६१-२०२६ गारगाई प्रकल्प.DOCX

Scanned with OKEN Scanner